# प्रकरण दहावे

## वृध्द शेतकरी स्त्री

निसर्गाच्या समतोलानुसार कोणत्याही समाजाचा आर्धा भाग स्त्रीयांचा असतो शेतकरीसमाज देखील याला अपवाद नसतो याचाच अर्थ एकूण भारतीय लोक संख्येच्या ७० टक्के शेतकरी आणि त्यांच्या ५० टक्के म्हणजे भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ३५ टक्के शेतकरी स्त्रीयांचे प्रमाण आहे. शेतकरी स्त्रीयांचे जीवन कसे असते विशेषत: वृध्द शेतकरी स्त्रीयांना कोणत्या आवस्थेत जगावे लागते याची कल्पना अभ्यसकाला संशोधकाला भेटलेल्या वृध्द शेतकरी स्त्रीयासी चर्चा केल्या नंतर आली त्या सर्व शेतकरी वृध्द स्त्रीयांची प्रतिनिधी ठरू शकेल अशा क्ष बा वृध्द स्त्रीचे हे शब्द चित्र

### जन्म व बालपण :-

क्ष चा जन्म ५० वर्षा पूर्वी गडहिंग्लज तालूक्यातील एका खेड्यात शेतकरी कुटूंबात झाला ती जन्माला आली त्यावेळी त्यांचे कुटूंब एकत्र होतेत घरात ५०-६० माणसे एकत्र राहत क्ष चे व डील त्याचे भावू व चुलत भावू हे सर्वच एकत्र होते परंपरेने चाल आलेल्या शेती मध्ये सर्व जन काम करीत असत प्रत्येकाने आपआपल्या कुवती प्रमाणे व कुटूंब प्रमुखाने ठरवून दिल्या प्रमाणे सर्वजन कामे करीतत असत कोण जनावरे चारण्यास नेई कोण औताला जाई स्त्रीया घरातलेल व शेतातील त्यांची ठरलेली कामे करीत असत कुटूंबाचे सर्व व्यवहार व कामे ऋतू चक्राला जोडलेली असत पावसाळा हिवाळा उन्हाळा या तिन्हीही ऋतुना अनुसरून शेतीच्या कामाचे हंगाम

ठरलेले असत. क्ष चे कुटूंब आणी त्या गावातील इतर सर्वच शेतकरी समाज या -हाटगाड्यानुसार करीत राही. तिचे बालपण या मध्ये केंव्हाच निघुन गेले

<u>कौटूंबीक जीवन :-</u>

त्या वेळच्या प्रथेनुसार वयात यायच्या अगोदरच म्हणजे बारा तेराच्या वर्षीच तिचे लग्न शेजाराच्या गावातील अशाच एकत्र कुटूंब असणा-या शेतकरी समाजातील तरूणा बरोबर झाले त्याचे वय त्या वेळी १५-१६ वर्षाचे होते. क्ष लग्ना नंतर तीन चार वर्ष माहेरीच होती वयात आल्यानंतर ती सासरी नांदायला आली तिचा संसार सुरू झाला तिला मुले होवू लागली लवकर लग्न झालेले असल्याने मुलांची संख्या वाढली त्यावेळी कुटूंब नियोजन नव्हते . तिला एकंदर ८ मुले झाली तीन मुली आणि पाच मुले त्यातील एक मुलगा व एक मुलगी लहाणपणीच वारली उरलेली सहाजन मोठी होवून त्यांची लग्ने व्हराडे झाली त्यांना मुले होवूलागली क्षला नातवंडे झाली तिच्या कुटूंबातील लोकांची संख्या वाढू लागली

आज क्ष चे वय ५० च्या दरम्याने आले तरीही ती जवळ म्हातारी दिसते. गालपडे बसलेली आहेत केस पिकलेली आहेत हातपाय कृश झालेले आहेत. चेह-यावर सुरूकुत्याचे जाळे पसरू लागलेले आहेत.

प्रथम पहाणा-या एकाद्या आजोळकी मावशीला सांगूनही पटणार नाही की तिचे वय फक्त ५० वर्षे झालेले आहे. प्रथम दर्शनी ती ६०-६५ वर्षांची असावी असेच कोणालाही वाटावे अशी तिची अवस्था आहे तिला असे अकाली वृध्दत्व का यावे ? या संदर्भात कांही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रश्न संशोधकाने विचारले त्यांना उत्तरे देतांना ती म्हणाली -

" काय सांगायचे बाबा आमच्या नशीबाला जे भोग भोगायचे आले त्याचा हा परिणाम आहे बालपण संपल्या बरोबर मुले व्हायला सुरुवात झाली एकदा सुरुवात झाल्या बरोबर तीन वर्षाला दोन मुले असे प्रमाण पडत गेले घरातला पाळणा म्हणून हटला नाही पोरांचे लोंढारच पाठी मागे लागले त्यांना लहानाचे मोठे करणे संसाराचा गाडा ओढणे घरची कामे करुन शेतात राबणे विश्रांती कधीच नाही घाण्याच्या बैला प्रमाणे जन्म भर कामाला झुंपून घ्यावे लागले. त्याचा हा परिणाम आहे आता गाले बसत चालली आहे. अंगातील सर्व शक्तीच गळून गेल्या सारखे वाटते तरीही होईल तेवढी कामे करावी लागतात शेवट पर्यंत जमेल ती कामे करत राहणे हेच आपल्या हातात आहे.

कुटूंबात तुम्ही सुखी आहात का ? मुले सुंना नातवंडे मानदेतातका? वगैरे प्रश्नांची उत्तरे क्ष ने फारच निराशेने दिली

" कसले सुख आणि कसले दुख बाबा जे आहे ते बरेच मानून मरण येई पर्यंत [illegible]x जगायचे कोण आम्हाला मान देणार? शेतक-यांच्या बायकांना कोठला मान आणि सन्मान लहानपणी वडील माणसांचा

धाक तरुणपणी नव-याची जरब सासूचा जाच आणि आता या मुलांचा आणि त्यांच्या बायकांची कटकट आपलेच नसीब खोटे म्हणायचे आणि जगायचे


तुमचे आणि नव-याचे पटते काय? पूर्वी कधी नव-याने मारले आहे काय?


या प्रश्नाला या वयातही लाजत म्हातारी म्हणाली - " नव-याने मारलेले नांही असरे एकतरी शेतकरी सापडेल का? लहानसहान कारणावरुन एकदा नव्हे अनेकदा माझ्या नव-याने मला झोडपले आहे विनाकारण माझे कांही चुकले नसतांनाही अनेक वेळा मला बदडले आहे. दुसरा कसलाही राग माझ्यावर काढला जाई कामाचा ताण पडला की मला मार पडतात म्हणून समजावे शिवाय्यातर प्रत्येक वेळी खावून मला इतकी सवय झालेली आहे की त्यांनी एखादे दिवशी मला शिवी दिली नांही तर त्यांची तबेत बिघडलेली असावी असा मला संशय येतो व मीच त्यांना विचारते आज बरे वाटत नांही का? मग आपल्याला बरे वाटते हे सांगतानां देखील ते माझ्या आईबापाचा उध्दार करुनच सांगणार की त्यांची तबेत ठणठणीत आहे शिवीबाळीचे तुम्हा शिकलेल्या लोकांच्या बायकांना कौतूक वाटते पण आम्हा शेतक-यांच्या बायकांना त्याचे कांहीच वाटत नांही नव-याने मारायचेच असते शिव्या द्यायच्याच असतात व बायकांनी सर्व सहन करायचेच असते. अशी ग्रामीण समाजातील सर्वांची समजूत असते.

तुम्ही गावसोडून इतर कोठे प्रवास केला आहात काय? या प्रश्नावर क्ष म्हणाली - एक दोन वेळा काळभैरीच्या जत्रेला जाताना गडहिंग्लज बघीतले आहे. कांही पाहुण्यांच्या चार दोन मैलाच्या आत असलेल्या गांवी गेलो आहे. या शिवाय उभ्या जन्मात गांव सोडून कोठेही गेलो नांही सामानगडाच्या आणि काळभैरीच्या डोंगरा पलीकडे जग कसे आहे याची कल्पना नांही पंढरपूरला जाण्याची कल्पना नांही लहानपणा पासून मनात आहे पण ते अजून जमले नांही आणि या जन्मात जमेल असे वाटत नांही.

म्हातार पणी आपण निराधार आहोत असे वाटते का? या प्रश्नालाही म्हातारीने दिलेले उत्तर महत्वाचे आहे.

आम्हा शेतकऱ्यांच्या बायकांचा सगळा जन्मच दुसऱ्याच्या आधारावर असतो वडील नवरा मुले यांच्या आधारानेच आम्हाला जगावे लागते. त्यांच्या इच्छे प्रमाणे वागावे लागते. तरुण पणी त्याचे फारसे कांही वाटले नांही पण आता म्हातार पणी मात्र काळजी वाटत आहे हात पाय थकल्यावर अंथरुणाला खिळल्यावर आपली सेवा घरचे लोक करतील असे वाटत नांही. कसाही असला तरी आपला नवरा आहे तो पर्यंत काळजी नांही पण म्हाताऱ्याच्या माघारी मात्र आपली धडगत नांही असे वाटते. म्हणून देवाजवळ एकच मागणी आहे की मला भरल्या कपाळाने त्याने न्यावेत सौभाग्याचे मरण द्यावे कपाळावर कुंकू असतांनाच आणि हातपाय चालत असतांनाच डोळे मिटावेत "


कोल्हापूर जिल्हा
1
2
3
4
5
करवीर
6
कागल
8
चंदगड
12
अभ्यास क्षेत्र




अभ्यास क्षेत्र

गडहिंग्लज तालुका

[ मुलाखती घेतलेली गावे ]

मुलाखतीसाठी निवडलेल्या गांवाची यादी.

| अ. नं. | गावाचे नांव | गडहिंग्लज पासून अंदाजे अंतर. [ कि. मी. ] | अंदाजे लोकसंख्या. [ हजारांत ] |
|---|---|---|---|
| १ | गडहिंग्लज. | ० | २० |
| २ | गिजवणे. | १ | ५ |
| ३ | हनिमनाळ. | ५ | २ |
| ४ | शेंद्री. | ४ | १.५ |
| ५ | हलूरचंपू. | ६ | २.५ |
| ६ | वडरगे. | २ | २ |
| ७ | बड्याचीवाडी. | २ | १.५ |
| ८ | जखेवाडी. | ४ | १.५ |
| ९ | कडगांव. | ३ | ५ |
| १० | शिपूर. | ७ | १.५ |
| ११ | करंबळी. | ६ | २ |
| १२ | हिरलगे. | ८ | २ |
| १३ | ऐनापूर. | ६ | २ |
| १४ | बेळगुंदी. | ३ | २ |
| १५ | दुंडगे. | ३ | २.५ |
| १६ | हेब्बाळ. | ५ | २ |
| १७ | निलजी. | ७ | १.५ |
| १८ | मुत्नाळ. | ८ | २.५ |
| १९ | हिटणी. | १० | २ |
| २० | नांगनूर. | १५ | २.५ |
| २१ | अरळगुंडी. | १७ | २ |
| २२ | भडगांव. | २ | ५ |
| २३ | वैरागवाडी. | ६ | १ |
| २४ | हरळी खु" | ४ | २ |
| २५ | हरळी बु" | ५ | २ |
| २६ ~~महा~~ | महागांव. | ७ | ५ |
| २७ | चिंचेवाडी. | ४ | १ |
| २८ | खमलेहटी. | ६ | १ |
| २९ | नरेवाडी. | १२ | २ |
| ३० | नूल. | ५ | ४ |
| ३१ | कणदाळ. | [illegible] | २ |
| ३२ | हासूरसासगिरी. | ७ | १.५ |
| ३३ | बटकणंगले. | ८ | २ |
| ३४ | हेब्बाळ जलद्याळ. | १० | २ |
| ३५ | चाघराळी. | ९ | १.५ |
| ३६ | कळविकटी. | १६ | २ |

| अ. नं. | गावाचे नांव | गडहिंग्लज पासून अंदाजे अंतर. [ कि. मी. ] | अंदाजे लोकसंख्या. [ हजारांत. ] |
|---|---|---|---|
| ३७ | नेसरी. | १२ | ५ |
| ३८ | सरोळी. | १४ | १. ५ |
| ३९ | हडलगे. | १५ | २ |
| ४० | कुमरी. | १७ | १. ५ |
| ४१ | काळमावाडी. | १८ | १ |
| ४२ | यमेहटी. | २० | १ |
| ४३ | बेकनाळ. | २ | १. ५ |
| ४४ | इंचनाळ. | ७ | २. ५ |
| ४५ | औरनाळ. | २ | २ |
| एकूण:- | | | ११७५०० |